**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ०५ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **बिहार आणि आंध्र प्रदेशप्रमाणे महाराष्ट्रालाही विशेष दर्जा किंवा विशेष पॅकेज मिळावं यासाठी प्रयत्न करणार-उपमुख्यमंत्री अजित पवार यांची विधानसभेत घोषणा.**
2. **विदर्भ आणि मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या वतीनं निवृत्तीवेतनधारकांच्या सोयीसाठी ई-पीपीओ आणि पेन्शन समाधान उपक्रम सुरू.**
3. **नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत संपूर्णता अभियानास अमरावती, गडचिरोली आणि वाशीम जिल्ह्यांत आज सुरुवात.**
4. **न्यायाधीशांनी वस्तुनिष्ठपणे पुराव्यांच्या आधारे निर्णय प्रक्रिया राबवावी - सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओका यांचं प्रतिपादन.**
5. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून डॉ.प्रशान्त बोकारे यांनी स्वीकारला पदभार.**

****

## अजित पवार

बिहार आणि आंध्र प्रदेश प्रमाणे महाराष्ट्रालाही विशेष दर्जा किंवा विशेष पॅकेज मिळावं, यासाठी प्रयत्न करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत केली. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. दरम्यान निवडणूक डोळ्यासमोर ठेवून हा अर्थसंकल्प मांडला आहे. लाडकी बहीण योजनेच्या पार्श्वभूमीवर भावांसाठी योजना आणावी, अशी विरोधकांची मागणी त्यांनी पुरुषांसाठी असलेल्या विविध योजनांचं उदाहरण देऊन खोडून काढली. राज्याच्या राजकोषीय तुटीविषयी अर्थसंकल्पावरील चर्चेत विविध सदस्यांनी चिंता व्यक्त केली होती. त्यावर राज्यात ही तूट केंद्र सरकारनं घालून दिलेल्या ३ टक्क्याच्या मर्यादेत असल्याचं ते म्हणाले. चालू आर्थिक वर्षाअखेर राज्यावर ७ लाख ८२ हजार कोटी रुपयांचं कर्ज होईल.

गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत त्यात १० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. तरीही केंद्र सरकारनं आखून दिलेल्या मर्यादेत हे कर्ज असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. विविध पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी कर्ज आवश्यक आहे, असं पवार म्हणाले. महिलांसाठीच्या पिंक ई रिक्षा योजनेचा विस्तार करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. जिल्ह्याच्या क्षमतेनुसार योजनेचे लाभार्थी ठरवण्याचे अधिकार दिल्याचं अर्थमंत्र्यांनी जाहीर केलं. राज्यातल्या शेतकऱ्यांना साडे ८ लाख कृषी पंप दिले जातील. त्यासाठी ९० टक्क्यांपर्यंत अनुदान दिलं जाईल, असंही ते म्हणाले. यावेळी अर्थसंकल्पात ७० सदस्यांनी चर्चेत सहभाग घेतला होता. अर्थसंकल्पावर अजित पवार यांनी दिलेल्या उत्तरानं समाधान न झाल्यानं विरोधकांनी सभात्याग केला.

## फेरीवाले

मुंबईसह राज्यातील इतर शहरात अंदाजे ३० लाख फेरीवाले आहेत. पण त्यांच्यासाठी ठोस धोरण नसल्यानं आजही ते त्यांच्या हक्कांपासून वंचित आहेत. २०१४ साली लोकसभेनं फेरीवाल्यांसदर्भात कायदा केला आणि राज्यानं तशा प्रकारे फेरीवाला धोरण आखणे अपेक्षित होते. परंतु १० वर्षानंतरही राज्यात फेरीवाल्यांसाठी ठोस धोरण नाही. केवळ योजना नसल्यानं फेरीवाल्यांना अमानुष वागणूक मिळते, त्यांचे साहित्य जप्त केलं जाते. सरकारनं फेरीवाल्यांबद्दल ठोस धोरण आखावं. तोपर्यंत सध्या पावसाळ्यात होत असलेली कारवाई तात्काळ थांबवावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. याबाबत मंगळवारी चर्चा करून योग्य ती कारवाई करण्याचं आश्वासन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलं.

## द्वैवार्षिक निवडणूक

विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी मतदान होणार हे आज स्पष्ट झालं. अर्ज मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी कुणीही अर्ज मागे न घेतल्यानं ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात आहेत. आता १२ जुलै रोजी मतदान होऊन त्याच दिवशी सायंकाळी मतमोजणी होणार आहे. भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश

टिळेकर आणि अमित गोरखे रिंगणात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाने आणि भावना गवळी, काँग्रेसकडून प्रज्ञा सातव निवडणूक लढवत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्यानं शेकापाचे जयंत पाटील विधान परिषदेची निवडणूक लढवत आहेत. विधानसभा सदस्यांमधून यापैकी ११ सदस्य विधान परिषदेवर निवडून जाणार आहेत. विजयी होण्यासाठी उमेदवारांना पहिल्या पसंतीची २३ मत मिळवणे आवश्यक आहे.

## 'पेंशन समाधान एक डिजीटल विंडो'

प्रधान महालेखाकार लेखा आणि हकदारी -2 नागपूर यांच्या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील विदर्भ आणि नागपूर क्षेत्रातील 19 जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारकांच्या कल्याणाकरिता इलेक्ट्रॉनिक पेन्शन पेमेंट ऑर्डर्स-ई-पीपीओ आणि सेवानिवृत्त शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या समाधानासाठी 'पेंशन समाधान- एक डिजीटल विंडो' हे उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. एक पथदर्शी प्रकल्प म्हणून गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात नागपूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यांना ई-पीपीओ डिजीटल पुढाकाराचा शुभारंभ जया भगत, प्रधान महालेखापाल यांच्या हस्ते करण्यात आला होता. या प्रकल्पाचा विस्तार आता मराठवाडा आणि विदर्भातील सर्व 19 जिल्ह्यात करण्यात आला असून या प्रकल्पाच्या यशस्वी चाचणीला महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागानं मान्यता दिली आहे. 1 जून 2024 पासून महाराष्ट्रातील या सर्व 19 जिल्ह्यांसाठी पीपीओ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ई-पीपीओ सुविधेत निवृत्ती वेतनाच्या स्थितीबद्दल एसएमएस द्वारे सूचना मिळतील. या सुविधेमुळे निवृत्तीवेतनधारकाला प्राधिकार पत्रे अंतिम झाल्याच्या दिवशीच प्राप्त करता येतील. तर 'पेंशन समाधान एक डिजीटल विंडो' च्या माध्यमातून या कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या गुगल फॉर्म, ऑनलाइन हेल्प डेस्क, टोल फ्री क्रमांक, प्रत्यक्ष अर्ज याद्वारे तक्रारी नोंदवल्या जाऊ शकतात. निवृत्तीवेतन

धारकांसाठी असलेल्या या दोन्ही डिजिटल उपक्रमांचा लाभ घेण्याचं आवाहन जया भगत यांच्याद्वारे करण्यात आलं आहे.

## संपूर्णता अभियान

नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत संपूर्णता अभियानाचा शुभारंभ आज गडचिरोली जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यपालन अधिकारी राजेंद्र भुयार यांच्या हस्ते नियोजन भवनाच्या सभागृहात करण्यात आला. या अभियानासाठी गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी, सिरोंचा आणि भामरागड या ३ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत शिक्षण, आरोग्य, कृषी, पोषण इत्यादी विकास क्षेत्रातील विविध ३९ निर्देशांक उंचावण्यास भर दिला जाणार आहे. त्यामुळे सामूहिक प्रयत्न करून सर्वांनी अभियान यशस्वी करावं, असं आवाहन भुयार यांनी केलं. याप्रसंगी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, कृषी कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, बचत गटाच्या कार्यकर्त्या आदींना सन्मानित करण्यात आलं. याशिवाय आज अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा इथून रॅली काढून या अभियानास सुरुवात झाली. चिखलदरा तालुका हा विकासापासून वंचित असल्यामुळे निती आयोगानं विशेष लक्ष देत आकांक्षित तालुका कार्यक्रम सुरू केला आहे. त्याचप्रमाणे वाशीम जिल्ह्यांत संपूर्णता अभियानाचं जिल्हाधिकारी बुवनेश्र्वरी एस यांच्या हस्ते उद्घाटन झालं.

## अतिसार प्रतिबंध

“ग्रामीण स्वच्छता अभियान आणि अतिसार रोखा राष्ट्रीय मोहीम, अशा परस्परानुरूप उपक्रमांमुळे सार्वजनिक आरोग्य राखण्याप्रति सरकारची वचनबद्धता अधोरेखित होते. अशा संयुक्त प्रयत्नांद्वारे बालमृत्यू कमी करण्याबरोबरच आरोग्य आणि स्वच्छतेच्या सवयींनी युक्त अशी संस्कृती संपूर्ण ग्रामीण भारतात निर्माण करण्याचं आमचे ध्येय आहे”, असं प्रतिपादन केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी केलं. जलशक्ती मंत्रालयाचा पेयजल आणि स्वच्छता विभाग अतिसार रोखण्यासाठी सुरू केलेल्या राष्ट्रीय मोहिमेत सहभागी होत आहे. शुद्ध पाणी आणि स्वच्छतेवर आम्ही लक्ष केंद्रित करणार असून प्रत्येक

आठवड्यात टप्प्याटप्प्यानं त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे, असं पाटील यांनी सांगितलं.

## न्यायमूर्ती अभय ओका

न्यायिक क्षेत्रामध्ये न्यायाधीशांद्वारे दिल्या जाणाऱ्या निर्णयांची रचनात्मक टीका ही कायद्याच्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षित असून, केवळ जनभावनेच्या आधारावर न्यायाधीश न्यायदान करू शकत नाहीत. त्यांना वस्तुनिष्ठपणे पुराव्यांच्या आधारे निर्णय प्रक्रिया राबवावी लागते, असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओका यांनी आज नागपूरमध्ये केलं. वर्धा रोडवरील वारंगा इथल्या महाराष्ट्र राष्ट्रीय नागपूर विधी विद्यापीठ-एमएनएलयूतर्फे आज न्यायमूर्ती एस.एम.दौड स्मृती व्याख्यानात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओका यांनी 'आपल्या न्यायप्रणालीची विश्वसनीयता' या विषयावर विचार व्यक्त केले.

## डॉ.प्रशान्त बोकारे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून डॉ. प्रशान्त बोकारे यांनी आज पदभार स्वीकारला. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांना राज्यपाल कार्यालयाकडून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून पदाची सूत्रं सांभाळण्याचे आदेश प्राप्त झाले होते. यावेळी कुलसचिव डॉ.राजू हिवसे, परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ संचालक डॉ.प्रफुल्ल साबळे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते. काल नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुभाष चौधरी यांना राज्यपालांनी दुसऱ्यांदा निलंबित केल्यानंतर बोकारे यांच्याकडे हा कार्यभार देण्यात आला आहे.

## प्यारे झिया खान

हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टचे अध्यक्ष प्यारे झिया खान यांची महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपालांच्या आदेशानुसार, राज्य अल्पसंख्याक विभागानं काल एक अधिसूचना जारी करून प्यारे खान यांची आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली.

## हवामान

विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली असून उद्या नागपूर, वर्धा, अमरावती, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता आहे. आगामी सात जुलैपासून सलग तीन दिवस संपूर्ण विदर्भात विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, अकोला इथं विदर्भातील  सर्वाधिक कमाल तापमान 36.4 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

## विषबाधा

अमरावतीच्या धामणगाव रेल्वे तालुक्यातील विरुळ रोंघे इथं राहणाऱ्या एकाच कुटुंबातील चार जणांना काल रात्री जेवणातून विषबाधा झाल्यानं एका ११ वर्षीय मुलीचा रात्री तर दुसरीचा सकाळी मृत्यू झाला. उर्वरित दोन कुटुंबियांवर धामणगांव रेल्वे इथं एका खासगी दवाखान्यात उपचार सुरू आहेत. नामकरणविधीच्या कार्यक्रमानंतर आयोजित भोजनातून विषबाधा झाल्यानं ५ बालकांसह २८ जणांची प्रकृती बिघडल्याची घटना गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातल्या रोपीनगट्टा गावात घडली. प्रकृती बिघडलेल्या नागरिकांपैकी २२ जणांना गडचिरोली इथल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात, तर ६ जणांना छत्तीसगडमधील पाखांजूर येथील रुग्णालयात भरती करण्यात आलं आहे.

******